**Sakaal, Pune, January 22, 2010**

# 'टीसीएस'तर्फे आयटी क्विझचे आयोजन

पुणे, ता. २१ : टाटा कन्सल्टन्सी सर्व्हिसेसतर्फे (टीसीएस) टीसीएस आयटी क्विझ या स्पर्धेचे आयोजन करण्यात आले असून, २९ जानेवारीस नेहरू मेमोरिअल हॉल येथे होणार आहे. मुलांमध्ये माहिती तंत्रज्ञानाबद्दल जागरूकता निर्माण करणे हे या स्पर्धेचे उद्दिष्ट आहे. शिक्षण, मनोरंजन, पुस्तके, मल्टी मीडिया, संगीत, चित्रपट यांवर 'आयटी'चा प्रभाव पडला असून, यांचा समावेश स्पर्धेत असणार आहे. आठवी ते बारावीमधील विद्यार्थ्यांसाठी ही स्पर्धा खुली असून, कोणतेही प्रवेशशुल्क यासाठी आकारले जाणार नाही, असे पत्रकात नमूद केले आहे. यासाठी अर्ज करण्याची अंतिम मुदत पंचवीस जानेवारी असून, अधिक माहितीसाठी स्पर्धेच्या समन्वयक सूचीत मंत्री यांच्याशी मोबाईल क्रमांक ९२२५५०८३०४ वर संपर्क साधावा, असे आवाहन केले आहे.